# जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष
# जिल्हा परिषद पालघर

## स्वारस्य अभिव्यक्ति (EOI) फॉर्म

कामाचे नाव:- घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प कामाकरिता सर्वेक्षण करणे, अंदाजपत्रके व प्रस्ताव तयार करणे, आराखडे तयार करणे, पर्यवेक्षण करणे व तांत्रिक सल्ला/सहाय्य प्रदान करणे.

व्यावसायिक संस्था/स्वयंसेवी संस्था नाव व पत्ता:- ------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

Scanned with CamScanner

## प्रपत्र - अ

| अ.क्र. | तपशील | |
|---|---|---|
| १ | व्यावसायिक संस्था/स्वयंसेवी संस्था नाव | |
| २ | कार्यालयाचा पत्ता व संपर्क क्रमांक, ई-मेल आयडी | |
| ३ | संपर्क करावयाच्या व्यक्तीचे नाव व संपर्क क्रमांक | |
| ४ | व्यावसायिक संस्था/स्वयंसेवी संस्था नोंदणी प्रमाणपत्र | सोबत जोडावे |
| ५ | GST प्रमाणपत्र | सोबत जोडावे |
| ६ | मागील ३ वर्षाचे आयकर विवरणपत्र | सोबत जोडावे |
| ७ | जाहिरातीत नमूद केलेले कामाबाबतचे अनुभव प्रमाणपत्र | सोबत जोडावे |

सही व शिक्का

## प्रपत्र - ब

| अ.क्र | तांत्रिक मनुष्यबळाचा तपशील (किमान ५) | | | |
|---|---|---|---|---|
| | नाव | पदनाम | शिक्षण | अनुभव |
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |
| ५ | | | | |

सही व शिक्का

Scanned with CamScanner

## *** अटी व शर्ती ***

१. सदर निविदेचे दर कार्यारंभ आदेशापासून एक वर्षापर्यंत वैध राहतील. याबाबत कार्यारंभ आदेशादरम्यानच्या कालावधीत शासनाकडून दरात कपात झाल्यास त्यानुसार अथवा शासनाकडून प्राप्त झालेल्या निर्देशानुसार बदल करण्यात येईल.

२. व्यावसायिक संस्था/स्वयंसेवी संस्था यांना घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन विषयक कामाचा किमान पाच वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

३. यापूर्वी इतर जिल्ह्यात काम केलेल्याचा DPR, अंदाजपत्रक व कार्यारंभ आदेशाच्या प्रति जोडणे आवश्यक आहे.

४. कोकण विभागातील ५ जिल्ह्यातील संस्थांचा प्राधान्याने विचार करण्यात येईल.

५. जागेची उपलब्धतता/परवाने यांची खात्री करुन प्रस्ताव सादर करावेत. प्रस्ताव तांत्रिक व प्रशासकीय मंजुरी मिळेपर्यंत त्यामध्ये होणा-या बदलानुसार प्रस्तावातील बदल आहे त्याच किमतीत करावा लागेल.

६. सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) सादर करुन दिलेल्या नमुन्यानुसार व बरोबर असल्याची खात्री करुन वरिष्ठ कार्यालयाच्या परवानगीने व निर्देशानुसार, एम्पेनेलमेंट व्यावसायिक संस्था/स्वयंसेवी संस्था यांनी सर्वेक्षण करणे, अंदाजपत्रके व प्रस्ताव तयार करणे, प्रकल्प आराखडे तयार करणे, पर्यवेक्षण करणे व तांत्रिक सल्ला/सहाय्य प्रदान करणे याबाबीं करिता ग्रामस्तरीय घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाकरिता तसेच जिल्हास्तरीय प्लॅस्टीक वेस्ट मॅनेजमेंट, मैला गाळ व्यवस्थापन (FSM) व गोबरधन याकरिता प्रत्येकी अनुज्ञेय असलेल्या निधीच्या ५% किंवा रूपये १,००,०००/- (रूपये एक लक्ष फक्त) यापैकी जी कमी असेल त्या रकमेची तरतूद प्रकल्पाच्या अंदाजपत्रकामध्ये अंतर्भूत करावी. सदर रक्कम अंदाजपत्रकामध्ये सामाविष्ट नसल्यास रक्कम अनुज्ञेय असणार नाही. व्यावसायिक संस्था/स्वयंसेवी संस्था यांना शुल्क म्हणून शासन स्तरावरुन संबंधीत गावाच्या घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पासाठी निधी उपलब्ध झालेनंतरच ग्रामपंचायतीमार्फत अदा करण्यात येईल.

७. **ग्रामस्तरीय घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प आराखड्यामध्ये खालील बाबींचा समावेश आहे.**

**अ) घनकचरा व्यवस्थापन:-**

१. सार्वजनिक कंपोष्ट पिट.
२. ट्रॉय सायकल, बॅटरी ऑपरेटेड ट्रॉय सायकल.
३. गावासाठी प्लास्टिक कचरा साठवण करण्यासाठी शेडचे बांधकाम करणे.
४. कुटूंबस्तरीय कचरा कुंडया.
५. सार्वजनिकस्तरीय कचरा कुंडया.
६. कुटूंबस्तरीय कंपोष्ट पिट.
७. कचरा वर्गीकरण साठवण व कंपोष्ट प्रकल्प परिसराचे व्यवस्थापन.
८. कचरा गोळा व वर्गीकरण करणे, यासाठीचे अदा करावयाचे मानधन/वेतन.
९. कचरा वर्गीकरणासाठी आवश्यक अवजारे.
१०. परिसर स्वच्छतेसाठी आवश्यक अवजारे.
११. घनकचरा व्यवस्थापनाची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती.
११. गावस्तरीय बायोगॅस प्रकल्प.

**ब) सांडपाणी व्यवस्थापन:-**

१. सार्वजनिक शोषखडडा, मॅजिक पिट/पाझर खडडा.
२. कुटुंबस्तरीय शोषखडडा, मॅजिक पिट/पाझर खडडा.
३. स्थिरीकरण तळे, Dewats, नाल्या व बंदिस्त गटारे, etc.
४. सांडपाणी व्यवस्थापनाची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती.

Scanned with CamScanner

८. घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनबाबत काम करित असताना केंद्र शासन व राज्य शासनाने वेळोवेळी पारीत केलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार काम करणे बंधनकारक आहे.

७. आदेशाच्या तारखेपासुन ३० दिवसांत सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करुन संबंधीत उपअभियंता ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग यांचेकडे सादर करणेचे आहेत.

८. सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणेस विलंब झाल्यास आपण दंडास पात्र राहाल, (दंड किती आकारावयाचा याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेश अंतिम राहतील).

९. सदरचे दर सन २०२१-२२ च्या आर्थिक वर्षासाठी लागु राहतील. आर्थिक वर्ष संपल्यानंतर आवश्यक असल्यास मुदतवाढ देणे किंवा नवीन दरपत्रक मागविणे ही बाब मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अधिकारात राहील.

१०. वेळोवेळी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पा व स्व) व कार्यकारी अभियंता (ग्रापापु) तसेच वरिष्ठ कार्यालयाने दिलेल्या लेखी व तोंडी सुचनेनुसार कार्यवाही करणेत यावी.

११. निवड केलेल्या संस्थेने संबंधीत ग्रामपंचायतीशी १०० रु. च्या स्टॅम्पपेपरवर सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) कामा बाबत करार करावा.

१२. निवड केलेल्या संस्थांचे करार कोणतेही कारण न देता रद्द करणेचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे राखून ठेवण्यात आले आहेत.

१३. सांडपाणी व घनकचरा प्रकल्प व्यवस्थापनाकरिता एका पेक्षा जास्त संस्थांचे पॅनेल तयार करुन प्रस्तावित प्रकल्पांची गावे वाटप करण्याचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे राखून ठेवणेत आलेला आहे.

**१४. जाहिरातीत नमुद अटी व शर्ती मान्य असले बाबतचे स्वाक्षरी असलेले करारपत्र ५००/- रुपयाच्या स्टँपपेपरवर सादर करावे.**

१५. उपरोक्त अ व ब प्रपत्रामध्ये माहिती भरुन तसेच अटी व शर्ती मान्य असलेबाबतचे करारपत्र जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जिल्हा परिषद पालघर या कार्यालयाकडे बंद लखोटयात विहीत मुदतीत सादर करावे. विहीत मुदतीनंतर सादर केलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

5/5/2021

(तुषार माळी)
**प्रकल्प संचालक**
**जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन**
**जिल्हा परिषद पालघर**

(सिद्धाराम सालीमठ, भाप्रसे)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद पालघर**

Scanned with CamScanner

# जिल्हा परिषद पालघर
# जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष

जिल्हा परिषद पालघर

Email- sbmzppalghar@gmail.com

## जाहिरात नमुना

**महाराष्ट्र शासन**
**(जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन, जिल्हा परिषद पालघर)**
**स्वारस्य अभिव्यक्ती (EOI)**
**Expression of Interest Notice**
**स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत व्यावसायिक संस्था/स्वयंसेवी संस्था म्हणून काम करु इच्छिणा-या संस्थांची विहित नमुन्यात सुची तयार करण्यासाठी आवेदन**

स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत पालघर जिल्ह्यात सन २०२१-२२ साठी निवडक ग्रामपंचायतीमधील गावामध्ये घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प कामांकरिता सर्वेक्षण करणे, अंदाजपत्रके व प्रस्ताव तयार करणे, प्रकल्प आराखडे तयार करणे, पर्यवेक्षण करणे व तांत्रिक सल्ला/सहाय्य प्रदान करणे करिता पाणी पुरवठा व स्वच्छता क्षेत्रातील काम करणा-या व्यावसायिक संस्था/स्वयंसेवी संस्था यांचेकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. याबाबत कामाचे प्रारुप, अटी व शर्ती www.zppalghar.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत

**अर्ज स्विकारण्याची अंतिम तारिख दि. १७/०५/२०२१ रोजी सायंकाळी ५.४५ पर्यंत**

**अध्यक्ष**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद पालघर**
**लोकमान्य पाडा ,(विष्णूनगर रोड)मिडलक्लास सोसायटी ,राधा निवास समोर , प्लॉट नं,२ . दुसरा मजला. ता, जि. पालघर**
Email- sbmzppalghar@gmail.com